# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०२/२०१३** **दिनांक २४.०१.२०१३**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ४.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दि.२४.०१.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५०६१-२०१३, दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.२४.०१.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. किशोर मोरे,कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **हॉस्पिटल मॅनेजमेंट सॉफ्टवेअर देणगी म्हणून स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२५/१०/२००५ रोजी संस्थानच्या सुपर स्पेशालिटी व जनरल स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी M/s Softscript Systems and Services Ltd., Mumbai या कंपनीकडून रु.७,००,०००/- किंमतीस हॉस्पिटल सॉफ्टवेअर खरेदी करार झाला असुन सदर कंपनीने श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये बिलींग विभाग, स्टोअर विभाग या विभागात सप्टेंबर २००७ मध्ये संगणकप्रणाली कार्यान्वित केली आहे. एकुण किंमती पैकी ६०% रक्कम व दरमान्यच्या कालावधीत जिवनदायी योजना मोडयुल व उर्वरीत मोडयुल कार्यान्वित करुन त्यातील दोष दुर करण्यास अनुसरुन रु.२,५०,०००/- रक्कमेपैकी ५०% अशी एकुण रु.५,७२,०००/- रक्कम अदा करण्यात आली आहे. तथापी त्याची पुर्तता न करता त्यासाठी रु.१७,००,०००/- व नवीन डॉट नेट (.net Computer Language) साठी रु.३०,००,०००/- व या व्यतिरीक्त कस्टमायझेशन, मेन्टेनंस इ. साठी स्वतंत्र रक्कमेची मागणी केली आहे.

हॉस्पिटल सॉफ्टवेअरचा समोवश साई टेक प्रकल्पात नसल्याचे आयटी विभागाकडुन समजले आहे. सध्या साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेले सॉफ्टवेअर पुर्णपणे कार्यान्वित नाही. सक्षम सॉफ्टवेअर अभवी प्रत्यक्ष कामात अनेक अडचणी येतात, रुग्णांची वाढती गर्दी, नव्याने सुरु होणारी राजिव गांधी आरोग्य योजना यांचा विचार करता सक्षम नियंत्रणाचे दृष्टीने अद्यावत सर्व मोडयुर्ल्स असलेल्या संगणकप्रणालीची तातडीने आवश्यकता आहे म्हणजे १ एप्रिल २०१३ पासुन सुरु होणा-या आर्थिक वर्षासाठी त्याचा वापर करता येईल.

काही सॉफ्टवेअर कंपन्या हॉस्पिटलांसाठी विकसित केलेली संगणकप्रणाली संस्थानच्या रुग्णालयासाठी कशी उपयुक्त ठरेल, याची माहिती/डेमो देण्यासाठी येतात. यामध्ये M/s Manorama Infosolution Pvt. Ltd. या कंपनीच्या प्रतिनिधींनी दि.१२/०१/२०१३ रोजी दोन्ही रुग्णालयातील मॅनेजर्स, विभाग प्रमुख, मेट्रन, सिस्टर इंनचार्ज, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक अशा एकुण ३० अधिका-यांना प्रत्यक्ष डेमो दिला आहे. या दिवशी कंपनीच्या Executive Director & CEO सौ अश्विनी दानीगौड स्वत: भेट दिली. रुग्णालयाचे सामाजिक कार्य पाहुन त्यांनी विकसित केलेले सॉफ्टवेअर संस्थानसाठी देणगी स्वरुपात देण्याची तयारी दाखविली आहे. सॉफ्टवेअरसाठीच्या एकुण खर्चाचे विवरण खालील प्रमाणे-

| Sr.No. | Particular | Amount | Mode of Payment |
|---|---|---|---|
| 1. | HMS Software (with all Modules including **e-tendering** module) | 20,00,000/- | As Donation |
| 2. | Implementation Cost | 2 Lakh | |
| 3. | Users/Staff Training Cost | 2.5 Lakh | |

सॉफ्टवेअर प्रत्यक्ष कार्यान्वित झाल्यानंतर हॉस्पिटलच्या मागणीनुसार मॉडीफिकेशन्ससाठी प्रति दिन प्रति डेव्हलपर्स रु.२,५००/- अथवा पहिल्या वर्षासाठी **रु.३ लाख** अशी ऑफर दिलेली आहे. सध्या मार्केटमध्ये, इंटरनेटवर अनेक सॉफ्टवेअर्स मोफत उपलब्ध असतात तथापी त्याचा वापर मार्यादीत असातो तर वापर सुरु झाल्यानंतर पुढील वर्षांसाठी मेन्टेनंस, AMC किंमत अवाढव्य

असते. सदर बाबत त्यांनी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षासाठी प्रति वर्ष रु.३ लाख (सॉफ्टवेअर किंमतीच्या १५%) व चौथ्या व पाचव्या वर्षासाठी प्रति वर्ष रु.४ लाख आकारण्याचे मान्य केले आहे. सदर खर्च अवाढव्य नसुन इतर कंपन्याच्या तुलनेत कमी आहे कारण यामध्ये ते आवश्यक असलेले कस्टमायझ ेशन करुन देण्यास तयार आहे.

सॉफ्टवेअरचा प्रत्यक्ष डेमो पाहिला असता सध्या मार्केटमध्ये हॉस्पिटलसाठी उपलब्ध असलेल्या अद्यावत सॉफ्टवेअर पैकी हे एक अद्यावत सॉफ्टवेअर असल्याचे दिसुन आले आहे. इतराच्या तुलनेत यांचेकडे E-Tendering सिस्टीम जास्त आहे. या सॉफ्टवेअरचे रिपोर्ट साईटेक प्रोजेक्टशी इंन्टीग्रेट करुन देण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे. पहिल्या वर्षी सलग ६ महिने रेसिडंन्ट इंजिनिअर ठेवला जाईल. सध्या एकुण १५० रुग्णालयामध्ये हे सॉफ्टवेअर वापरले जात आहे, असा एकंदरीत आढवा घेता सदर संगणकप्रणाली श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. नव्याने सुरु होत असलेल्या राजिव गांधी आरोग्य योजनेत रुग्णांच्या होणाऱ्या संभाव्य गर्दीवर, बिले सादर करणे यावर नियंत्रण ठेवणे सोईचे होईल. याठिकाणी सुरळीत झाल्यावर श्री साईनाथ रुग्णालयात अशाच प्रकारे अंबलबाजवणी करता येईल. त्यास अनुसरुन सदर M/s Manorama Infosolution Pvt. Ltd यांचे सॉफ्टवेअर देणगी म्हणुन स्विकारण्यास व विहीत बाबी नमुद करुन करार करण्यास व त्यासाठी लागणारा प्रत्यक्ष इंम्प्लीमेंनटेशन व स्टाफ ट्रेनिंग खर्च रु.४,५०,०००/- खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर.

निर्णय क्र.५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालय विभागासाठी आवश्यक असलेले हार्डवेअर व सॉफ्टवेअर असे दोन्ही एकत्रित खरेदीसाठी तातडीने विहीत कार्यपध्दतीने टेंडर मागविणेत यावे.**

**तसेच, M/s Manorama Infosolution Pvt. Ltd यांना त्यांचे देणगीचा प्रस्ताव टेंडर प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन मांडणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

विषय नं.०२ **संस्थानचे संरक्षण विभागासाठी कंत्राटी पध्दतीने सैन्य दलातील अधिकाऱ्याची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान हे जागतिक किर्तीचे देवस्थान असून देश विदेशातून दैनंदिन हजारोच्या संख्येने भक्त श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येत आहेत. ठराविक दिवशी शिर्डी येथे श्री साईभक्तांची गर्दी लाखांच्या संख्येत जाते. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांच्या संख्येत दिवसंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. भक्ताची होणारी गर्दी विचारात घेता मंदिर व मंदिर परिसरात सार्वजनिक शांतता प्रस्तापीत राहून भक्तांना श्रींचे दर्शन सुलभ व शांततामय वातावरणात घेता यावे, चोर-खिसे कापू यांचेपासून त्यांचे संरक्षण व्हावे ही संस्थान प्रशासनाची अत्यंत महत्वाची व नैतीक जबाबदारी आहे. त्यातच सध्य परिस्थितीमध्ये शिर्डीसह देशातील महत्वाच्या धार्मिक स्थळांना दहशतवादी धोक्याचा इशारा असून संरक्षण विषयक मुद्दा अत्यंत महत्वाचा झालेला आहे. त्यामुळे संरक्षण विषयक सर्व जबाबदाऱ्या अत्यंत कर्तव्य दक्षतेने व बारकाईने पार पाडण्यासाठी संस्थानचा संरक्षण विभाग व या विभागाचे अधिपत्य करणारे संरक्षण विभाग प्रमुख हे तेवढेच सतर्क व कार्यक्षम असणे अत्यंत आवश्यक व जरुरीचे आहे.

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे सुरक्षा कामाबाबत सद्य परिस्थिती तसेच या विभागाचे कामाचा वाढलेला व दिवसंदिवस वाढत चाललेला व्याप विचारात घेता संस्थानचे सुरक्षा विभागाचे काम पहाण्यासाठी कंत्राटी पध्दतीने सैन्य दलातील एका निवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. संस्थानचे संरक्षण विषयक कामाचे स्वरुप व आवश्यकता विचारात घेऊन नेमणूक होणाऱ्या अधिकाऱ्यास जबाबदाऱ्या निश्चित करुन देता येतील. त्यादृष्टीने खालील मुद्यास अनुसरून निर्णय होणेस विनंती आहे.

१) कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाचा सैन्य दलातील अधिकारी कोणत्या दर्जाचा असावा ?

२) नेमणूक करावयाच्या सदर अधिकाऱ्याचे उच्चतम वय किती असावे ?

३) कंत्राटी पध्दतीने नेमणूक केल्या जाणाऱ्या सदर अधिकाऱ्यास दरमहा एकत्रित किती वेतन/ मानधन द्यावयाचे?

४) नेमणूक केल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यास त्याचे कंत्राटी पध्दतीचे सेवा कालावधीत कोणत्या सेवा सुविधा द्यावयाच्या ?

५) सदर अधिकाऱ्याची नेमणूक किती कालावधीसाठी करावयाची आहे ?

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी दिवसेंदिवस होणारी भक्तांची प्रचंड गर्दी विचारात घेता, मंदिर व मंदिर परिसरात सार्वजनिक शांतता प्रस्थापीत राहून भक्तांना श्रींचे दर्शन सुलभ व शांततामय वातावरणात घेता यावे. तसेच, चोर-खिसे कापू यांचेपासून**

**साईभक्तांचे संरक्षण व्हावे, याकरिता संस्थानची सुरक्षा विषयक कामे पहाण्यासाठी सैन्य दलातील सेवा निवृत्त झालेले दोन अधिकारी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधनावर/ फिक्स वेतनावर संरक्षण विभागाकडे घेण्यात यावेत. त्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागणी करण्यात यावी, याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र. ६०** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**०१)** ग्रेट इंडियन नौटंकी कंपनी (GINC), गुरगाव यांचे संचालक श्री.अनुमोद शर्मा यांनी त्यांचे दिनांक १८.०१.२०१३ रोजीचे ई-मेल पत्रानुसार श्री साईबाबा संस्थान व GINC यांचे संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे श्री साईबाबांचे चरित्रावर आधारित नाटयप्रयोग व्यावसायिक तत्वावर चालविणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याद्वारे GINC यांनी श्री साईबाबांचे जीवनावर उन्नत तंत्रज्ञान, साऊंड, लाईट व डिस्प्ले वापरुन जागतिक दर्जाच्या नाटकाची निर्मिती करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

आजचे सभेमध्ये ग्रेट इंडियन नौटंकी कंपनी (GINC), गुरगाव यांचे संचालक श्री.अनुमोद शर्मा व त्यांचे सहकारी हजर होते. त्यांनी या प्रकल्पाबाबत सभेस पुढीलप्रमाणे माहिती दिली.

सदरहू नाटयप्रयोग सादरीकरणाकरीता संस्थानमार्फत नाटय प्रयोगाचे स्टेज, प्रेक्षकांची बैठक व्यवस्था इ. करिता साधारणतः ३ एकर क्षेत्रफळाची जागा, १,००,००० चौ.फुट क्षेत्रफळाचे ऑडीटोरियम व या नाटयप्रयोगासाठीच्या एन्टरटेन्मेंट टॅक्समध्ये स्थानिक संबंधीत विभागांकडून सवलत मिळवून द्यावी. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांकडून आवश्यक त्या परवानग्या मिळवून द्याव्यात, अशा मागण्या त्यांनी संस्थानकडे केलेल्या आहेत.

GINC यांचेमार्फत साईबाबांचे जीवनावर आधारीत जागतिक दर्जाचे नाटकाची निर्मिती केली जाईल, सदर नाटयप्रयोगामध्ये श्री साईबाबांचे चरित्रातील प्रसंगावरील प्रसिध्द कथांचे सादरीकरण केले जाईल व नाटयप्रयोगाकरीता आवश्यक सर्व टेक्नीकल साहित्य (उदा. स्टेज, लाईट, ऑडीओ-व्हिडीओ) तेच उपलब्ध करुन देणार आहेत.

संस्थानचे जमिनीची किंमत गृहीत न धरता या प्रकल्पावर होणाऱ्या इतर भांडवली खर्चापैकी GINC यांचेमार्फत ५५% तर संस्थानमार्फत ४५% रक्कम गुंतविणे प्रस्तावित आहे. सदर नाटयप्रयोगाच्या तिकिट विक्रीमधून उपलब्ध होणारे उत्पन्नापैकी GINC यांना ८०% तर संस्थानला २०% वाटा मिळण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

ग्रेट इंडियन नौटंकी कंपनी (GINC) यांचे किंगडम ऑफ ड्रिम्स हे गुरगाव येथे स्थित असून तेथे Zangoora- A Gypsy Prince व Jhumroo- A tribute to Kishore Kumar हे दोन शो प्रदर्शित करणेत येतात.

**समिती सदस्यांनी गुरगाव येथे प्रत्यक्ष जाऊन तेथील प्रकल्पाची समक्ष पहाणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.५८ ते ६० सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी